PROBLEMS OF TRIBAL FARMERS IN OBTAINING AND UTILIZING BENEFITS OF AGRICULTURAL AND TRIBAL DEVELOPMENT SCHEMES

Gaikwad V.J.* and Dhane V.P. **

INTRODUCTION

India is the country of different castes, creeds and religions. A large number of tribal communities i.e. Adivasis are found in India. The total population of the tribal in India was 6.78 crore (according to 1991 census), accounting to about 8.01 percent of total population. The total tribal population of the State of Maharashtra was 73.18 lakhs (1991 census) accounting to about 9.27 percent of the total population of the state. A number of tribals like Bhils, Mahadeo Koli, Kokana, Thakar, Warli, Katkari, Korku, Pardhi etc. are found in Maharashtra.

Tribals mostly depends upon food gathering, hunting and agriculture for their livelihood. However, their agriculture is mostly traditional resulting in poor crop yields and subsequent low income. The tribals thereby mostly are found to remain in a state abject poverty.

For the upliftment of the tribals, the Government of India and Maharashtra have started a number of Agriculture Development Programmes and Schemes, viz., Special Class Project, Tribal Sub Plan, Other than Tribal Sub Plan and Modified Area Development Approach. A number of agricultural benefits are given to the tribal farmers under these schemes.

* Postgraduate Student, College of Agriculture, Pune 5
** Professor of Agricultural Extension College of Agriculture, Pune 5

The Ambegaon block in the northern region of Pune district has a sizeable proportion (20.91 percent) of tribal population. The Agricultural Tribal Development Schemes have been implemented in the said block since 1987-88. A large number of tribal farmers have benefited from the said schemes in the Ambegaon block. However, tribal beneficiaries are likely to face a number of constraints in obtaining and utilizing the benefits from the different Agricultural Tribal Development Schemes. The study was therefore, conducted with the following objective.

OBJECTIVE

To study the problems faced by the tribal farmers in obtaining and utilizing the benefits of Agricultural Tribal Development Schemes.

METHODOLOGY

The present study was conducted in Ambegaon block of Pune district. The block comprises of 136 villages and is predominantly a tribal area. Agricultural Tribal Development Schemes are in operation in 58 villages of the block and are divided into ten sub blocks. One village from each sub-block was randomly selected for the purpose of study. A list of 615 beneficiaries from the selected villages was obtained, of which 154 tribal farmer beneficiaries were selected by x/4 method. The data was collected from 150 beneficiaries with the help of specially designed interview schedule. Relevant statements were formulated about the different problems faced by the tribal farmer beneficiaries under different Agricultural Tribal Development Schemes, during obtaining and utilizing the benefits and accordingly simple percentage was worked out to know the extent of the problems faced by the tribal farmer beneficiaries.

FINDINGS

1) Problems faced by the tribal farmer beneficiaries in availing and utilizing the benefits of Tribal

Development Schemes in agriculture:

The data pertaining to the problems faced by the farmers is presented in Table 1.

Table 1
Problems faced by tribal farmer beneficiaries in availing and utilizing the benefits

Sr No	Particulars of the problems	Number	Percent (n=150)
A)	**Knowledge Problems**		
1.	Lack of knowledge about various schemes	60	40.00
2.	Lack of knowledge about the documentary requirements for approval of benefits under the various schemes.	82	54.66
3.	Lack of knowledge about filling of application	132	88.00
B)	**Problems during fulfilling of documentary requirement**		
1.	Excess of documentary requirement	83	55.33
2.	Obtaining the various documents was painstaking.	32	21.33
3.	Obtaining the various documents was time consuming.	97	64.66
C)	**During deriving the benefits**		
1.	Constant follow-off was required	22	14.66
2.	Requirement of excess time for approval of schemes and subsequent benefits.	122	81.33
3.	Official harassment during approval of schemes.	9	6.00
4.	Adequate guidance was not available	21	14.00
D)	**During disbursement of benefits**		
1.	Delay in disbursement of benefits after actual approval of schemes	38	25.33
2.	Loans sanctioned were not obtained at single time.	75	50.00
3.	Benefits derived were not as required	5	3.33
E)	**problems during utilizing**		
1.	Lack of scientific knowledge regarding use of inputs.	68	45.33
2.	Lack of proper guidance regarding the use of inputs.	32	21.33
3.	Lack of technical know how regarding the use of plant protection appliances and implements obtained through the schemes.	144	96.00
4.	Inadequate labour availability during adoption of schemes	28	18.66
5.	Interruption in work due to lack of capital at crucial time.	93	62.00

The result of the study indicate that a majority of the farmers opined that they faced problems viz., lack of knowledge about filling of application forms (88.00%), excess time for approval of schemes and subsequent benefits (81.83%) and lack of technical knowledge regarding the use of plant protection appliances and implements obtained through the schemes (96.00%). About two third of the tribal beneficiaries faced problems like time consuming business of obtaining necessary documents for the application forms (64.66%) and interruption in work due to lack of capital (62.00%), while about half of the tribal farmers found problems like lack of knowledge about the documents requirements for filling of application form (54.66%), excess of documentary requirement (55.33%), unavailability of sanctioned loan at one time (50.00%) and lack of scientific knowledge regarding use of inputs (45.33%). A very meager proportions of the tribal farmers expressed problems like official harassment during approval of schemes (6.00%), and receipt of unnecessary benefits through the schemes (3.33%).

CONCLUSION AND IMPLICATION

The results of the study indicate that the tribal farmers face a number of problems regarding knowledge of schemes and documentary requirements, ful-filling of documentary requirements for the approval of the said schemes, and during deriving and utilizing the benefits of the various schemes. It can therefore be amplified that the concerned authorities from Pinched Samiti should make the tribal farmers aware about the various agricultural schemes. They should also provide guidance to the farmers regarding proper utilization of the benefit received through the various schemes. It is also suggested that the documentary requirements for filling the forms for approval of schemes be kept to

the bare minimum so as to facilitate the farmers in availing the benefits of the schemes.

REFERENCES

1) Sinha, H.S. and Rajan, R. 1981. "An analysis of tribal loans in repayment of loans." Indian Journal of Extension Education. 17 (3-4) : 54-65.

2) Rao, E.N. and Gririjashankar, K. 1986. "Tribals are they better off ?" Kurukshetra, 34 (4) : 30-32.

* * *

गोंड आदिवासींची सांस्कृतिक, शैक्षणिक प्रगती : एक आढावा

* श्री. आर.डी.खरोसेकर

मागील अंकापासून म्हणजेच मार्च २००१ च्या अंकापासून संस्था महाराष्ट्रातील प्रमुख आदिवासी जमातींची थोडक्यात माहिती देत आहे. मागील अंकात ''भिल्ल'' या अनुसूचित जमातीची माहिती प्रकाशित करण्यात आली होती. या अंकात गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर इ. ठिकाणी असलेल्या ''गोंड'' या आदिवासी जमातीची माहिती देण्यात येत आहे. तसेच ठाकर जमातीची दुसऱ्या एका लेखात अशाच प्रकारची माहिती देण्यात येत आहे.

लोकसंख्येच्या दृष्टीने महाराष्ट्रातील दुसरी मोठी आणि महत्वाची जमात म्हणजे ''गोंड'' ही होय. या जमातीचे लोक फक्त महाराष्ट्रातच आहेत असे नाही, तर आंध्र प्रदेश, मध्यप्रदेश, ओरिसा या राज्यात या जमातीची लोकसंख्या महाराष्ट्रापेक्षा अधिक आहे. या चारही प्रातांतील ज्या भागात गोंड जमातीची वस्ती होती त्यासलग प्रदेशाला पूर्वी ''गोंडवन'' असे संबोधले जाई. महाराष्ट्रात गोंडांची वस्ती प्रामुख्याने विदर्भातील चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ, भंडारा, नागपूर या जिल्हयांतून आहे आणि मराठवाडयातील औरंगाबाद, परभणी व नांदेड या जिल्हयांत तुरळक प्रमाणात ही जमात आढळून येते. प्रामुख्याने महाराष्ट्रात गोंडांची एकूण लोकसंख्या सन १९९८ च्या बेंच मार्क सर्वेक्षणानुसार ९२,७९६ इतकी आदिवासी उपयोजना भागात आढळून येते.

मध्ययुगीन काळांत गोंड संपूर्ण मध्यभारतावर अधिपत्य करणारे प्रमुख राज्यकर्ते होते. ही जमात द्रविड परिवारातील मुख्य जमात समजली जाते. ''गोंड'' या शब्दाची व्युत्पत्ती काहींशी संधिग्ध आहे. हिंदू व मुस्लीम धर्माच्या लोकांनी या जमातीस ''कोईतूर'' किंवा ''कोई'' असे नांव दिले असावे. ''गोंड'' म्हणजे ''खोंड'' जनजातीपैंकी एक जमात असावी असाही एक मतप्रवाह आहे. तर तेलगू लोक ''खोंड''

*आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे १

या शब्दाचा उच्चार ''गोंड'' असा करत. त्यावरूनच पुढे ''गोंड'' असे नांव रूढ झाले असावे असे वाटते. याशिवाय गोंड लोक तामिळ, कानडी, तेलगू हया द्रविडी भाषा परिवारातीलच भाषा बोलत असल्यामुळे ते दक्षिणेकडून मध्यप्रदेश व इतरत्र आले असावेत. भाषेच्या अपभ्रंशामुळे त्यांना ''खोंड'' ऐवजी ''गोंड'' असे संबोधण्यात येऊ लागले असावे असाही एक मतप्रवाह आहे. सर जॉर्ज ग्रिअरसन या भाषातज्ञाच्या मते गोंडबोली तेलगूपेक्षा तामिळ व कानडी भाषेशी जास्त मिळतीजुळती अशी आहे.

गोंडांच्या एकंदर चाळीस उपजाती आहेत. त्यापैंकी महाराष्ट्रात पंधरा जमाती आहेत. त्यात प्रामुख्याने राजगोंड, राजपूतगोंड, माडिया, गैता, धुरवा, गोंडगोवारी इ. चा उल्लेख करता येतो. गोंडांनी स्वतंत्र राज्ये स्थापन केली. त्या राजसत्तेस मराठयांची सत्ता प्रस्थापित होईपर्यंत धक्का पोहचला नव्हता. नंतर मात्र मराठ्यांच्यात व मुस्लीमांच्यात जसजशया लढाया झाल्या तसतशी यांची राजसत्ता हळूहळू लोप पावू लागली. याच दरम्यान काही हिंदू धर्मात तर कांही इस्लाम धर्मात गोंडांचे धर्मातर झालेले दिसून येते. गोंडांचा इतर जमातींशी संबंध आल्याने त्यांच्यात नविन उपजमाती तयार झाल्या. त्यापैंकी खाती आगारिया, सोलादा व कोयला या जमाती गोंड खेडयातच राहतात. काही राज्यकर्त्या गोंड कुटुंबांची राजपूतांशीही सोयरिक झालेली आहे. राजपूतांनीच प्रथम गोंडांना हिंदू धर्मात घेऊन त्यांच्यांशी रोटीबेटी व्यवहार सुरू केलेला इतिहासावरून दिसून येतो. यासंबंधांतून निर्माण झालेली प्रजा स्वत:ला राजपूत किंवा राजगोंड असे म्हणू लागली असावी. या राजगोंडांनी १३ ते १७ या शतकात मध्यप्रदेशात अनेक राज्ये स्थापिली व परचक्र ज्या ज्या वेळी आले त्या त्या वेळी या गोंड राज्यांनी राजपूतांना मदतच केलेली आहे. ''राजगोंड'' ही जमात पूर्वीच्या राजे लोकांची वंशज म्हणून त्यामुळे ओळखली जाऊ लागली. धूरगोंड ही राजगोंडापेक्षा कमी दर्जाची जमात आहे आणि परधान ही पोटजमात पूर्वीच्या गोंडराजांच्या प्रधान असणाऱ्या गटाची वंशज असावी.

गोंड लोक प्रामुख्याने शेतीवर उपजिविका चालवतात. चंद्रपूरमध्ये प्रामुख्याने मुख्यपीक हे भाताचे आहे तर यवतमाळ जिल्हयातील गोंडलोक ज्वारीचे पीक काढतात. याशिवाय उडीद, मूग , तूर, वालपापडी,

लालभोपळा, अंबाडी, वांगी अशी विविध प्रकारची कडधान्ये व भाजीपाला यांची पिके काढतात. गोंडांचे एक धान्याच्या बाबतीत मुख्य वैशिष्टय म्हणजे ते "पडुंम" झाल्याशिवाय कापणीच करत नाहीत. शेतीशिवाय कांही गोंड गायी-म्हशी, शेळया, कोंबडया पाळतात. सणावारी कोंबडीचा देवासमोर बळी देण्यासाठीसुध्दा ते वापर करतात. तसेच गाई म्हशीचे दूध काढीत नाहीत. गाईला ते देवता मानतात. याशिवाय मासेमारी, शिकार करणे, जंगलात जाऊन डिंक, मध, कंद, झाडांच्या साली गोळा करतात. वर्षातून एकदा ते सार्वजनिक शिकारीस जातात व मिळालेल्या शिकारीचे गांव जेवण घालतात. शेतीसाठी गाई म्हशींचाही वापर करताना दिसून येतो. गोंडांच्या खेडयातील स्वच्छता वाखाणण्यासारखी असते. त्यांची खेडी स्वयंपूर्ण असतात. जनावरांसाठी स्वतंत्र झोपडया बांधतात. गोंडांची घरे ही बांबूपासून बनविलेली असतात. त्यांच्या भिंती हया बांबूच्याच असतात तर छप्पर गवताचे असते. झोपडीतील एक भाग स्वयंपाकघर म्हणून वापरतात व उर्वरित भागाचे ते चटया वापरून विभाजन करून वेगवेगळया कामासाठी वापरतात. धान्याच्या कणग्या स्वयंपाकघराच्या आतील बाजूस असतात. या कणग्या बांबूने विणलेल्या असतात किंवा जाड दोराच्या असतात. इतर पदार्थ साठविण्यासाठी मडक्यांचा वापर करतात. तवा देखिल मातीचाच असतो. कडू भोपळ्यापासून चमचे, डावा, उलथणी बनवून त्याचा दैनंदिन वापरासाठी उपयोग करतात.

गोंडाचा मुख्य पेहराव म्हणजे पुरुष फक्त कमरेभोवती सुती कपडा गुंडाळतात. तर डोक्याला विविध पक्षांच्या पिसांनी तयार केलेली टोपी घातात. गळयात विविध प्रकारच्या मण्यांच्या माळा घालतात. तर स्त्रिया गुडघ्यापर्यंत साडीवजा वस्त्र गुंडाळतात व पदराने उरोभाग झाकतात. दारिद्र्यामुळे पुरेसे अन्न व वस्त्र नसल्याने हिवाळयात हे लोक शेकोटीभोवती झोपतात. त्यामुळे भाजण्याचे अपघात बरेच होतात.

गोंड स्त्रियांना केशभूषेची विशेष आवड असल्याचे दिसून येते. या स्त्रिया डोक्यात विविध आकाराच्या व रंगाच्या एकापेक्षा जास्त लाकडी फण्या खोचतात. तसेच गळयात रंगबिरंगी मण्यांच्या माळा घालतात. पायात चांदीचे पैंजण किंवा ॲल्युमिनियमचे पैंजण व जोडवी घालतात. तर हातात चांदीच्या बांगडया,

गोठ, वाकीसारखे दागिने घालतात. हे दागदागिने साधे असले तरी आकर्षक असतात. याशिवाय गळयात पुतळयांच्या व रूपयांच्या माळा तसेच चांदीचे लॉकेट्स घालतात. कानात कर्णफुले तर बोटात विविध आकाराच्या व प्रकाराच्या अंगठया घालतात. याशिवाय स्त्रियांची आणखी एक हौस म्हणजे सर्व शरीरभर त्या गोंदवून घेतात. यात धार्मिकता असते. गोंदवल्याशिवाय गोंड स्त्रिया मरण पावल्या तर त्या परलोकात जातात असा त्यांचा समज आहे. गोंड विविध प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू बनवितात व त्या ते आपल्या दैनंदिन जीवनात वापरात आणतात. उदा. तंबाखूच्या डब्या. हया डब्या विविध आकार देऊन लाकडाच्या बनविलेल्या असतात. हा एक उत्तम कलाकुसरीचा नमुना आहे.

गोंडांच्यात प्रत्येक पोटजमातीत निरनिराळी गोत्रे आहेत व त्या प्रत्येक गोत्रास एक निराळे नांव असते. ते त्या गोत्रातील सर्व माणसांस सारखेच लागू असते. निरनिराळया गोत्रात निरनिराळया देवांच्या पूजा असतात. (१) चार देवांची पूजा करणारे, (२) पांच देवांची पूजा करणारे, (३) सहा देवांची पूजा करणारे, (४) सात देवांची पूजा करणारे अशी गोत्रे असून एक गोत्र आल्यास त्या स्त्री-पुरूषांचा विवाह केला जात नाही. राक्षस पध्दतीने विवाह करण्याची प्रथा रूढ आहे. गोंडांचे विवाह हिंदू विवाह पध्दतीनुसार होतात. त्यांच्यात लग्नाला पुरोहित असतो. गोंड जमातीत मुलाकडून मुलीला वधूमूल्य दिलेजाते. लग्न ठरल्यानंतर सर्वांना जेवण व दारू दिली जाते. सर्व आदिवासी जमातींमध्ये आनंद अथवा दुःखाच्या प्रसंगी दारूचा विशेषत्वाने उपयोग केलेला आढळून येतो. मूल जन्माला आल्यानंतर व माणूस मेल्यावर दारू दिली जातेच असे आढळून आले आहे. गोंड जमातीत विधवा विवाह संमत आहे. तसेच पळून जाऊन गांधर्व पध्दतीनेसुध्दा विवाह केला जातो. विवाह ठरविण्यासाठी ''गोटूल'' चा उपयोग केला जातो. गोटूलात तरूण-तरूणी एकत्र येतात. तेथे एकत्र राहून आपला जीवनसाथी निवडतात व नंतर लग्नविधी केले जातात. त्यांच्यात बहुपत्नी विवाह संमत आहे. सर्व विवाह वराच्या घरी केले जातात. घटस्फोट मान्य केला जातो. घटस्फोटासाठी जातपंचायत बोलाविली जाते. दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेऊन समेट घडला नाही तर ठराविक वधूमूल्य देऊन घटस्फोट दिला जातो. विवाहबाहय संबंधास मान्यता दिली जात नाही.

गोंड जमातीत इतर जमातींसारखे वेगवेगळे सण साजरे केले जातात. मातादेवीची यात्रा, संजरीबिद्री देवाचा उत्सव, वाघदेवाची पूजा, शिमग्याचा सण साजरे करतात. गोंड राज्यकर्ती जमात असल्याने दसऱ्याचा सणही साजरा केला जातो. त्यादिवशी मुखियास किंवा राजास भेटण्याची प्रथा आहे. इतर अनेक जमातींप्रमाणेच गोंडांच्यात सुध्दा "होळी" सण मोठया धुमधडाक्यात साजरा केला जातो. आदिवासींच्या जीवनात अत्यंत महत्वाचा सण मानला जातो. याचे मुख्य कारण म्हणजे एकतर जंगलाचा व त्यांचा असलेला अतूट संबंध व शेतीची, पिकपाण्याची सर्व कामे पूर्ण झालेली असतात. नवीन धान्य घरात आल्याने मनाला व शरीराला आवश्यक असणारा विरंगुळा हा एक महत्वाचा हेतू असतो. तो म्हणजे एकत्र येऊन नृत्य करण्याचा. होळीच्या सणात सर्व गोंड एकत्र येऊन रात्रीपासून नृत्यास सुरवात करतात. तेपहाट होता होता त्यांचे नृत्य थांबते. यावेळी विविध प्रकारची लोकगीते म्हटली जातात. यात प्रामुख्याने रेलॉ रेलॉ गीत माडिया गोंड जमातीत म्हटले जाते. आदिवासींच्या जीवनात नृत्य व गीताला महत्वाचे स्थान आहे. सर्व प्रकारच्या कार्यक्रमात त्यांच्याकडून वेगवेगळया पध्दतीची गाणी म्हटली जातात.

गोंड जमातीत माणूस मेल्यानंतर त्यास पुरतात. श्वापदांनी प्रेत उकरू नये म्हणून दगडांचा ढीग रचतात. कांही गोंड उपजमातीत दहनही केले जाते.

अंधश्रध्दा हा प्रत्येक आदिवासी जमातीत दिसून येणारा एक भाग आहे. गोंडांच्यातही तो आहे. मूल आजारी पडले तरी ते डॉक्टरकडे न जाता भगताला बोलावितील किंवा त्याच्याकडे त्या मुलाला घेऊन जातील तो सांगेल ते अघोरी उपचार करतील. त्यामुळे या भागात लहान मुलांचे मृत्यूचे प्रमाण अधिक आहे. तसेच औषधपाण्यासाठी आवश्यक असणारा पैसा व असे उपचार करून घेण्यास लागणारी मानसिकता त्यांच्याकडे नसते. तरी आता हळू हळू त्यांच्यात सुधारणा घडून येताना दिसते.

जागतिक आरोग्य संघटनेमार्फत (WHO) प्रत्येक पाडयाला / गांवाला हेल्थवर्कर व दायी यांची नेमणूक केली असून प्रथमोपचार कसा करावा हयाबाबत प्रशिक्षण देण्यात आले असून हे प्रशिक्षण नागपूर कुटुंब केंद्राचे प्राचार्य, जिल्हा आरोग्य अधिकारी व त्यांचे सहकारी यांच्या सहकार्याने भामरागड येथे दोन ते तीन

वेळा १९९९ - २०००, २०००-२००१ व २००१-२००२ या वर्षात वर्षातून दोनवेळा प्रशिक्षण देण्यात आले. ट्रेनिंगमध्ये मुख्यत्वे गोंड जमातीतील आदिवासींना आरोग्यसंबंधीच्या अडीअडचणी यांच्यावर चर्चा घेऊन अतिदुर्गम भागातील गंभीर पेशंटना दवाखान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी व गंभीर पेशंटना तातडीने उपचार करण्यासाठी केंद्र सरकारकडे महाराष्ट्र शासनाने योजना सादर केली आहे. या भागातील हेल्थ वर्करांना (आरोग्यसेवकांना) दुर्गम भागात फिरण्यासाठी सायकली व प्रथमोपचार साहित्य पुरविण्यात आले आहे तर दाईंना प्रथमोपचार करण्यासाठी प्रथमोपचार संच पुरविण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासनाने प्रथमोपचार पध्दतीची माहिती पटवून देण्यासाठी दुर्गम भागांत जाऊन दाईंच्या नेमणूका केल्या आहेत. यात आदिवासी महिलांच्या व बालकांच्या आरोग्यासंबंधीने येणाऱ्या अडचणींबाबत मार्गदर्शन करून त्यांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. तक्ता क्रमांक १ वर आरोग्यासंबंधीने जमातीनिहाय आकडेवारी देण्यात आलेली आहे. या तक्यात या संस्थेने १९९६-९७ मध्ये घेतलेल्या बेंच मार्क सर्वेक्षणांतर्गत गोंड व त्याच्या उपजमातींनी वैद्यकीय सेवेचा लाभ घेतलेल्या कुटुंबांचे वर्गीकरण केलेले दर्शविण्यात आलेले आहे. ते पुढीलप्रमाणे :

तक्ता-१

एकूण कुटुंबे	हॉस्पिटल सुविधा घेणाऱ्यांची कुटुंबसंख्या		
९७७९७	९१८६१		
	वैद्‌	भगत	इतर
	५२७९	९१९९	४७५०६

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता सदर जमातीचे लोक वैद्यकीय सेवेचा मोठया प्रमाणात लाभ घेताना दिसून येतो. वैद्‌ व भगत या पारंपारिक वैद्यकीय उपचार घेणाऱ्यांची संख्या हळूहळू परंतु निश्चितपणे कमी होताना दिसून येत आहे. गोंड व त्याच्या उपजातीतील कुटुंबांनी वेगवेगळया कारणास्तव उपचार घेतलेल्या कुटुंबांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता-२

एकूण कुटुंबे	आजारपण एकूण	लसीकरण	प्रसुतीपूर्व औषधोपचार	प्रसुती	कुटुंबकल्याण	वैद्यकीयसल्ला
९२७९६ १००%	८९१८९ ९६%	३१२६३ ३३%	१६१९७ १७%	१२७०१ १३%	१७९२३ १९%	७१०८२ ७६%

वरील आकडेवारीचे अवलोकन केले असता गोंड व त्यांच्या उपजातीतील कुटुंबे वेगवेगळया कारणास्तव शासकीय सुविधा असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र, शासकीय दवाखाने इ. सुविधांचे लाभ घेताना दिसून येत आहेत. तथापि वरील आकडेवारीवरून प्रसुतीपूर्व औषधोपचार व कुटुंबकल्याण इ. कारणास्तव उपचार घेणाऱ्या कुटुंबांची संख्या कमी असल्याचे दिसून येते. यासाठी सदर जमातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे.

दुर्गम भाग, दारिद्रय, घरातील लोकांची असलेली जास्त संख्या, शिक्षणाचे महत्व नसल्याने या जमातीत शिक्षण घेण्याकडे जास्त लक्ष देण्यात आलेले नाही. परंतु शासनाकडूनच त्यांना प्राथमिक शिक्षण, प्रौढ शिक्षण निरंतर शिक्षण योजनेंतर्गत शिक्षण अशा विविध उपायांनी शिक्षणाचे महत्व पटवून देण्यात आले आहे. त्यामुळे गोंड जमातीत बऱ्यापैकी शिक्षण घेतलेली मुलेमुली सध्या आढळून येताना दिसतात. काही गोंड आमदार, खासदार, डॉक्टर, वकील, शासकीय व निमशासकीय अधिकारी झालेले दिसून येत आहेत.

या संस्थेने १९९६-९७ साली घेतलेल्या बेंच मार्क सर्वेक्षणांतर्गत गोंड व त्याच्या उपजातीसंबंधित शैक्षणिक स्थिती पुढीलप्रमाणे दिसून येते. गोंड व त्याच्या उपजमातींच्या एकूण ३,७८,५४७ व्यक्तींपैकी १,८२,७०५ इतक्या व्यक्ती साक्षर होत्या. त्यांची साक्षरतेची टक्केवारी एकूण ४८.२६ इतकी आहे. या जमातीतील पुरूष साक्षरतेची टक्केवारी ५८.८७ इतकी आहे तर स्त्री साक्षरतेची टक्केवारी ३७.२७ इतकी आहे.

शैक्षणिक स्थिती तक्ता

एकूण व्यक्ती	साक्षर व्यक्ती	निरक्षर व्यक्ती	त्यापैकी कलाशास्त्र, वणिज्य शाखेतील पदवीधर व्यक्ती
३७८५४७	१,८२,७०५	१,९५.८४२	७०४

अभियांत्रिकी व वैद्यकीय शाखेत अनुक्रमे २० व ४६ विद्यार्थी शिकत आहेत तर पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमासाठी ५८ विद्यार्थी शिकत आहेत. एकूण व्यक्तींपैकी साक्षरतेचे प्रमाण ४८% एवढे आहे तर पदवीधारकांचे प्रमाण एकूण व्यक्तींशी ०.२०% एवढे येत आहे.

वरील लेखावरून असे दिसून येते की, गोंड जमातीत शैक्षणिक व इतर बाबतीत हळूहळू प्रगती होत आहे. सध्याचे चित्र जरी शैक्षणिक क्षेत्रात अगदी नगण्य दिसून येत असले तरी ते भविष्यात बदल घडवून आणण्यास उपकारकच ठरू शकेल. तसेच वैद्यकीय सोयी सुविधांसाठीसुध्दा म्हणावे लागेल. कारण आजारी पडल्यानंतर जरी ते प्रथम वैदू किंवा भगत किंवा जडीबुटी यांकडे जात असले तरी कालांतराने लक्षात आल्यावर दवाखान्याकडे वळून तेथील उपचारांना हळूहळू प्राधान्य देऊ लागतील व सध्याचे चित्र बदलून ते सुधारणांकडे जाताना दिसून येईल व भविष्यामध्ये त्यांची सुधारणा झाल्याचे दिसून येईल.

संदर्भ :-

१. महाराष्ट्रातील अनुसूचित जमाती- डॉ.गोविंद गारे
२. मराठी विश्वकोष- खंड-४
३. महाराष्ट्रीय ज्ञानकोष- खंड-११
४. बेंचमार्क सर्वेक्षण-१९९६ मालिका क्र.३

* * *

आदिवासी विकास विषयक योजनांचा लाभ कसा घेता येईल यासंबंधाने लाभधारकांना मार्गदर्शन

*श्री.एस.पी.बनसोडे,

आदिवासी उपयोजना सुरु झाल्यापासून आजपर्यंत आदिवासी विकासाच्या विविध योजना कार्यान्वित होत गेल्या व त्यामधून आदिवासी उपयोजना क्षेत्रात रस्ते, वीज, पाणी, दवाखाने इ.ची चांगली सोय झाली व सर्वसामान्य आदिवासी बांधव आपआपल्या गांवात सुखाने राह् लागला.

तरीही आदिवासी बांधवांना आजही असे वाटते की, मला हे मिळेल काय ? मला ते मिळेल काय ? कोठे मिळेल ? कसे मिळेल व लवकर मिळण्यासाठी मी काय करु ?

याचा अर्थ ती योजना, सवलत व त्या योजनेचा लाभ आदिवासी बांधवाच्या अपेक्षेनुसार कसा मिळेल याबाबत सर्व ठिकाणी चौकशी केल्यावर बहुतेक जणांनी उत्तर दिले की, प्रकल्प कार्यालयात जाऊन संपर्क साधावा. प्रकल्प अधिकारी यांच्या कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास निरीक्षक व प्रकल्पस्तरीय यंत्रणेचे अध्यक्ष यांना भेटून योजनेच्या लाभाकरिता नांव देणे व त्यानंतर लाभ प्राप्त करुन घेणे अशी आदिवासींना माहिती देण्यात येते व माहिती जवळ जवळ बरोबर असल्याचे जाणवते.

अर्थात, आदिवासी बांधवांना धीर देणारी ही यंत्रणा आदिवासींना लवकर मदत उपलब्ध करुन देते काय ? सुरवातीचे उत्तर नाही असेच म्हणावे लागेल. कारण प्रथम अर्ज करा. नंतर नांवनोंदणी करा नंतर प्रशिक्षण घ्या नंतर लाभाकरिता संपर्कात रहा. त्यानंतरही लाभधारकांच्या यादीत आपले नांव असेलच याची आदिवासींना शाश्वती नाही. म्हणून आदिवासी बांधवांनी त्यांना हव्या असलेल्या योजनेच्या लाभासाठी शक्य तो लवकरात लवकर प्रकल्प कार्यालयाकडे अर्ज करणे अत्यंत

*उपसंचालक (संशोधन), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे

आवश्यक आहे व अर्ज केल्यानंतर त्यावर कार्यवाही होत आहे किंवा नाही, यावर सतत लक्ष ठेवून माहिती मिळविणे आवश्यक आहे व वारंवार प्रकल्प कार्यालयाशी संपर्कात राहणेही आवश्यक आहे. म्हणजेच योजनेचा लाभ गतीने मिळण्यास खूप मदत होते व लाभ निश्चितच प्राप्त होतो यात शंका नाही.

कोणत्या योजनेसाठी कोणाकडे संपर्क साधावा/अर्ज कसा करावा याची माहिती पुढीलप्रमाणे-

१.	शासकीय आदिवासी आश्रमशाळेत मोफत प्रवेश पाहिजे	मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा यांचेकडे छापील नमुन्यात अर्ज करावा.
२.	शासकीय आदिवासी वसतिगृहात मोफत प्रवेश पाहिजे	गृहपाल, शासकीय मुलांचे वसतिगृह यांचेकडे अर्ज करावा.
३.	आदिवासी विकास महामंडळाकडील खावटीचा लाभ पाहिजे	प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ
४.	आदिवासी भागात नवीन अनुदानित आश्रमशाळा मंजूर करुन घेणे	आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
५.	आदिवासी युवक-युवतींना सैन्य व पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षणाचा लाभ घ्यावयाचा आहे.	प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
६.	आदिवासी बांधवास जातीचा दाखला तपासून घ्यावयाचा आहे.	अनु.जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,पुणे/ नाशिक/ ठाणे/ अमरावती/नागपूर/ औरंगाबाद
७.	आदिवासी बांधवास विहिर व पंप पाहिजे/पीव्हीसी पाईप पाईजे.	संबंधित प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र.
८.	आदिवासी बांधवांना न्युक्लिअस बजेटअंतर्गत प्रशिक्षण योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे. अथवा रोजगार तथा उत्पन्न निर्मितीच्या योजनेमध्ये सहभागी व्हावयाचे आहे.	

याप्रमाणे उपरोल्लेखित योजना या आदिवासी बांधवांना उपयुक्त असणाऱ्या आहेत व त्यासाठी त्यांनी थेट प्रकल्प अधिकाऱ्यांकडे अर्ज देऊन नांवनोंदणी केली पाहिजे म्हणजे

प्रकल्प अधिकारी या योजनेचा लाभ त्यांना देऊ शकतील.

आदिवासी बांधवांनी बदलत्या परिस्थितीत बदलणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून बदलणाऱ्या अधिकाऱ्यांकडून सतत माहिती प्राप्त करुन घेतली पाहिजे. म्हणजे कार्यकर्त्यांना व लाभधारकांना सर्व योजनांचा लाभ होत असल्याचे चित्र पहावयास मिळू शकते. सर्व आदिवासी जनतेस सर्व योजनांचा लाभ मिळत नाही, असे चित्र उभे केले जात असले तरी ते तितकेसे स्पष्ट नाही. प्रयत्नांच्या प्रमाणात, उपलब्ध अनुदानाच्या प्रमाणात व लक्ष्यांकाच्या प्रमाणात योजनेची कार्यवाही चालू असल्याचे दिसून येते.

धुळे जिल्ह्यातील कोकणा भिल्ल, मावची, पावरी ठाणे जिल्ह्यातील वारली, कोकणा, नाशिक जिल्ह्यातील कोकणा, महादेव कोळी व अहमदनगर जिल्ह्यातील महादेव कोळी, रायगड जिल्ह्यातील कातकरी, नांदेड मधील कोलाम, यवतमाळ जिल्ह्यातील गोंड व कोलाम आणि चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील माडिया गोंड, परधान व भंडारा जिल्ह्यातील गोंड या सर्वांच्या सर्वांगीण विकासासाठी आदिवासी उपयोजनेच्या वर उल्लेख केलेल्या विहित योजना कार्यान्वित आहेत. आदिवासी बांधवांनी त्याचा जरुर लाभ घ्यावा व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प या कार्यालयाशी सतत संपर्कात राहणे आवश्यक आहे.

राज्यामध्ये नाशिक येथे आदिवासी विकास आयुक्तालय कार्यरत असून तेथे आयुक्त दर्जाचे अधिकारी योजनांचे संनियंत्रण करतात. त्याशिवाय ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर या चार ठिकाणी अपर आयुक्त, आदिवासी विकास ही प्रकल्प अधिकारी यांच्या कामामध्ये समन्वय साधून आदिवासी विकासाच्या योजना राबविण्यात मदत करतात. त्या व्यतिरिक्त सुमारे २४ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामधून सुमारे ७३.१८ लाख आदिवासींसाठी सर्वांगीण विकासाच्या योजना कार्यान्वित आहेत.

मंत्रालय पातळीवर स्वतंत्र आदिवासी विकास विभाग कार्यरत असून सचिव दर्जाचे अधिकारी व स्वतंत्र कॅबिनेट दर्जाचे मंत्री व राज्यमंत्री, आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांचे कामकाज पाहतात.

याकरिता राज्य योजनेच्या सुमारे ९

टक्के नियतव्यय आदिवासी विकास विभागास उपलब्ध करुन दिलेला आहे. नाशिक येथे आदिवासी विकास आयुक्तालयाखेरीज आदिवासी विकास महामंडळाचेही राज्यस्तरीय कार्यालय असून व्यवस्थापकीय संचालक, यांच्या प्रशासकीय देखरेखीखाली महामंडळाचे कार्य चालते. याशिवाय पुणे येथे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था नांवाची संस्था कार्यरत असून पुणे येथे आयुक्त दर्जाचे अधिकारी व क्षेत्रीय पातळीवर ६ तपासणी समित्यांची उपसंचालकांची कार्यालये ही आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या अधिनस्त कार्यरत आहेत. अशाप्रकारे राज्यामध्ये आदिवासी विकासाच्या संनियंत्रणाच्या विविध पातळीवरील यंत्रणा आदिवासी बांधवांसाठी कार्यरत आहेत.

* * *

ठाकर जमातीची सामाजिक व आर्थिक स्थिती- एक आढावा

*पी.आर.तिकोने,

ओळख :-

महाराष्ट्रातील एकूण ४७ जमातीमध्ये ठाकर ही एक आदिवासी जमात असून ती महाराष्ट्रातील ठाणे, रायगड, पुणे, नाशिक व अहमदनगर या सह्याद्रीच्या पर्वतरांगेमधील जिल्ह्यामध्ये बहुसंख्येने आढळते.

ठाकर जमात राहत असलेल्या जिल्हा/तालुक्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	प्रमुख जिल्हे	प्रमुख तालुके
१.	ठाणे	मोखाडा, जव्हार, पालघर, शहापूर, वाडा, वसई, भिवंडी, मुरबाड, कल्याण व ठाणे
२.	रायगड	कर्जत, खालापूर, पेन, पनवेल व सुधागड
३.	पुणे	जुन्नर, आंबेगांव, खेड व मावळ
४.	नाशिक	इगतपूरी, नाशिक व सिन्नर
५.	अहमदनगर	अकोले, राहुरी व संगमनेर

का.ठाकर व मा.ठाकर अशा ठाकर जमातीच्या दोन उपजाती (endogamous divisions) आहेत. या दोन उपजाती एकमेकांमध्ये रोटी-बेटी व्यवहार करीत नाहीत.

सर्वसाधारणपणे ठाकर जमात ही शेती, जंगल वा डोंगरदऱ्यालगतच्या पाड्यावर लहान झोपडी/घरामध्ये राहते. त्यांच्या घराच्या भिंती ह्या कारवीने कुडलेल्या असतात. त्यावर शेण मातीचा लेप चढविलेला असतो. घरावर छप्पर म्हणून कौले किंवा गवताचा वापर केला जातो.

* संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

लंगोटी, कोपरी किंवा बंडी आणि फेटा हा ठाकर पुरुषाचा परंपरागत पेहराव आहे. आता लंगोटी ऐवजी धोतराचा वापर केला जात आहे. लुगडे, चोळी व फडके हा ठाकर स्त्रीचा पेहराव असून त्यांना दागिन्यांची खूप आवड आहे. ते चांदीच्या दागिन्याचा वापर करतात. तर अंगावर गोंदणे हे ठाकर स्त्रियांना खूप आवडते.

तांदूळ, नागली, वरई, उडीद, वाल, तूर, कुळीथ व हरभरे यांचा ते अन्नात वापर करतात. ते मांसाहारी असून जंगलातील पक्षी खात नाहीत.

शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय. शेतीबरोबर ते शेतमजूरी,जंगलमजूरी, अन्य मजुरी करतात. शिकार करणे, मासेमारी, जंगलातील फळे गोळा करणे इत्यादी पूरक व्यवसाय ते करतात. ठाकर समाजात विधवांना पुर्नविवाह करण्यास परवानगी असून त्यांच्यामध्ये घटस्फोटची प्रथा रुढ आहे. त्यांची स्वतंत्र जात-पंचायत असून जात पंचायतीच्या प्रमुखास पाडेखोत (पाटील) असे म्हटले जाते.

वाघ्या, हिरवा, डोंगरदेव, गांवदेव इ.त्यांच्या देवदेवता असून प्रथेप्रमाणे त्यांचे उत्सव ते साजरे करतात.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी सन १९९७-९८ मध्ये महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना (चारही प्रकारची क्षेत्र) क्षेत्रातील आदिवासींची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थिती जाणून घेण्यासाठी बेंचमार्क सर्वेक्षण घेतले होते. या सर्वेक्षणामध्ये ठाकर जामतीच्या बाबतीत आढळलेल्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

वास्तव्य :-

राज्याच्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ठाणे, रायगड, पुणे, नाशिक व अहमदनगर या जिल्ह्यामध्ये ठाकर जमातीची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात तर धुळे, जळगांव, नांदेड, बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा व गडचिरोली या जिल्ह्यामध्ये ती अल्प प्रमाणात आढळली.

लोकसंख्या :-

सर्वेक्षणांतर्गत उपरोक्त जिल्ह्यामध्ये

ठाकर जमातीची १,८२,०१८ इतकी लोकसंख्या आढळली. यामध्ये ९२,७६९ इतके पुरुष तर ८९,२४९ इतक्या स्त्रिया आढळल्या. ठाकर जमातीची ३३,५६३ कुटुंबे आढळली.

साक्षरता :-

ठाकर जमातीची एकूण १,८२,०१८ इतक्या लोकसंख्येपैकी १,४९,९२३ (८२%) इतकी लोकसंख्या ६ वर्षे वयोगटावरील आहे. यापैकी ४३,५९३ (२९%) इतक्या ठाकर जमातीच्या व्यक्ती शिक्षित असून त्यामध्ये २८,९८५ (६६%) पुरुष व १४,६०८ (३४%) स्त्रिया आहेत. ठाकर जमातीमध्ये साक्षरतेचे प्रमाण २९ टक्के आहे. यामध्ये ठाकर पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण २० टक्के इतके आहे. सन १९८१ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण अनुक्रमे २१,२९ १२ इजके होते.

सर्वेक्षित एकूण गांवापैकी ४० गांवामध्ये १० टक्केपेक्षा कमी पुरुष साक्षर आढळले तर १४७ गांवामध्ये १० टक्केपेक्षा कमी स्त्रिया साक्षर आढळल्या. पुरुष व स्त्रिया या दोन्हीचा एकत्रित विचार केला असता १० टक्केपेक्षा कमी साक्षरता ५२ गांवामध्ये आढळून आली.

शैक्षणिक स्तर :-

ठाकर जमातींच्या ६ वर्षावरील एकूण १,४९,९२३ व्यक्तीपैकी १,०६,३३० (७१%) इतक्या व्यक्ती अशिक्षित आढळल्या तर केवळ २९ टक्के व्यक्ती साक्षर आढळल्या. या २९ टक्केमध्ये २ टक्के व्यक्तींना फक्त लिहिता किंवा वाचता येते. तर १६ टक्के व्यक्ती या इयत्ता ४ थी पर्यंत, ७ टक्के व्यक्ती या इ.७ वी पर्यंत तर ४ टक्के व्यक्ती या इ.१० वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या आढळल्या. इ.१२ वी. आय.टी.आय., डिप्लोमा, पदवी, वैद्यकिय/इंजिनिअरिंग पदवीधर, पदव्युत्तर यांची संख्या नगण्य आढळली. थोडक्यात खालच्या स्तराकडून वरच्या स्तराकडे जात असताना शिक्षित व्यक्तीचे प्रमाण कमी कमी होत गेल्याचे आढळले. थोडक्यात उच्च शिक्षण घेतलेल्या व्यक्ती ठाकर जमातीमध्ये कमी आढळल्या.

स्वतंत्रपणे ठाकर स्त्रियांचा विचार केला असता ६ वर्षावरील एकूण ७३,४५६ स्त्रियांपैकी ५८,८४८ (८०%) स्त्रिया या अशिक्षित आढळल्या. तर फक्त २० टक्के स्त्रिया शिक्षित आढळल्या. या २० टक्केची वर्गवारी तपासली असता फक्त १ टक्का स्त्रियांना लिहिता किंवा

वाचता येते तर इ.४ थीपर्यंत शिक्षण घेतलेल्या १२ टक्के, इ.७ वीपर्यंत शिक्षण घेतलेल्या फक्त २ टक्के स्त्रिया ठाकर जमातीत आढळल्या. त्यानंतर इ.१२ वी पदवी, पदव्युत्तर इ.शैक्षणिक स्तरामध्ये शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण नगण्य (१%) आढळले.

निवासाची स्थिती :-

सर्वेक्षणातील पाहणीमध्ये एकूण ३३,५६३ ठाकर कुटुंबापैकी ९५ टक्के कुटुंबे ही स्वतःच्या घरात राहत असल्याचे आढळून आले.तर ४ टक्के ठाकर कुटुंबे ही शासनाच्या 'इंदिरा आवास' या योजनेतून मिळालेल्या घरात राहत असल्याची आढळली. उर्वरित १ टक्क्यामध्ये ठाकर कुटुंबे ही गृहनिर्माण संस्था, भाड्याच्या घरात व इतर मालकीच्या घरात राहत असल्याची आढळून आली.

ठाकर जमातीच्या घरांच्या प्रकाराचा विचार केला असता, सर्वेक्षित एकूण ३३,५६३ कुटूंबांपैकी २३ टक्के कुटूंबे झोपडीमध्ये, ५७ टक्के कुटूंबे झोपडी परंतू कौलारु छप्पर असलेल्या घरात तर २० टक्के कुटूंबे ही पक्क्या घरात रहात असल्याची आढळून आली.

ठाकर जमातीच्या घराच्या आकारमानाची आकडेवारी तपासली असता, एकूण ३३५६३ कुटुंबापैकी, ११ टक्के कुटुंबे ही कमी आकारमानाची म्हणजे १०० चौ.फू.पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या घरात राहत असल्याची आढळली.तर ३५ टक्के ठाकर कुटुंबाकडे १०१-२०० चौ.फूट क्षेत्रफळ असलेली घरे आढळली. २०१ ते ३०० चौ.फू.आकारमान असलेल्या घरात राहत असलेल्या ठाकर जमातीच्या कुटुंबाचे प्रमाण २३ टक्के तर ३०० चौ.फूटापेक्षा जास्त आकारमानाच्या घरात राहत असलेल्या ठाकर कुटुंबाचे प्रमाण ३१ टक्के इतके आढळले.

भूधारक कुटुंबे :-

ठाकर जमातींच्या एकूण ३३,५६३ कुटुंबापैकी १५,४१२ (४६%) कुटुंबाकडे स्वतःची जमीन नसल्याचे आकडेवारीवरुन आढळले. तर १८,१५१ (५४%) कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन असल्याचे आढळले.

ठाकर जमातीच्या एकूण १८,१५१ भू-धारक कुटुंबापैकी १ टक्का ठाकर कुटुंबाकडे निव्वळ बागायती क्षेत्र, ४ टक्के कुटुंबाकडे बागायती+जिरायती (दोन्ही प्रकार) शेती

असलेली तर निव्वळ कोरडवाह् (जिरायती) शेती असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ९५% इतके आढळले. शेतजमीन असलेल्या ठाकर जमातींच्या कुटुंबामध्ये ८८ टक्के कुटुंबे ही अल्पभूधार या सदरात मोडतात.

मुख्य व्यवसाय :-

ठाकर जमातीच्या एकूण ३३,५६३ कुटुंबापैकी, ४८ टक्के ठाकर कुटुंबांचा शेतमजूरी तर ४४ टक्के ठाकर कुटुंबांचा शेती हा मुख्य व्यवसाय असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरुन आढळून आले. नोकरी व जंगलमजूरी हा मुख्य व्यवसाय असलेल्या कुटुंबाचे प्रमाण अनुक्रमे ५ व २ इतके आढळले. ठाकर जमातीत जिरायत शेती व भूमीहिनता यामुळे शेतमजूरी करणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते.

उत्पन्न :-

ठाकर जमात प्रामुख्याने शेती व शेतमजूरी या व्यवसायामध्ये गुंतलेली असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरुन दिसते व या व्यवसायांपासूनच त्यांना जास्त उत्पन्न मिळत असल्याचे आढळून आले. शेतीपासूनचे वार्षिक उत्पन्न रु.३६००/- इतके आढळले. सर्व मार्गाने मिळालेले ठाकर कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.७३००/- इतके आढळले.

शासकीय विकास योजनांचा लाभा :-

ठाकर जमातीतील एकूण ३३,५६३ कुटुंबापैकी २२,४११ (६७%) कुटुंबांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतला असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरुन दिसून आले. ज्या ३३ टक्के ठाकर कुटुंबियांनी योजनांचा लाभ घेतला नाही किंवा त्यांना लाभ झाला नाही. याबाबतच्या कारणांचा शोध घेतला असता त्यापैकी ७८% कुटुंबांना शासनाच्या कोणत्या प्रकारच्या योजना राबविल्या जात आहेत, याची माहिती नाही, असे उत्तर मिळाल्याचे उपलब्ध आकडेवाडीवरुन आढळले.

आरोग्य :-

ठाकर जमातीमध्ये आजारपणासाठी कोणत्या बिगर वैद्यकिय सुविधांचा वापर केला जातो याचा अभ्यास उपलब्ध आकडेवारीवरुन केला असता, ५२ टक्के कुटुंबे ही घरगुती उपचारावरच समाधान बाळगतात. त्यानंतर त्यांच्या पुढे 'भगत' हा पर्याय असतो. ठाकर जमातीत २० टक्के कुटुंबे ही आजारपणात भगताकडून उपचार करुन घेत असल्याचे

उपलब्ध आकडेवारीवरुन आढळले तर २ टक्के कुटुंबे ही स्थानिक आदिवासी वैदूंकडून औषधोपचार करुन घेत असल्याचे आढळून आले.

आदिवासी मूलतः शैक्षणिक आर्थिकदृष्ट्या खूपच मागास असल्याने अगदी वरिल पर्याय संपल्यानंतरच ते आजारपणासाठी शासकीय वैद्यकिय सुविधांचा लाभ घेतात, असे आढळून येते.

शासकीय वैद्यकिय सुविधांच्या वापराबाबतची आकडेवारी तपासली असता, सर्वसाधारण आजारपण, लसीकर, प्रसुतिपूर्व तपासणी, प्रसुती, कुटुंब नियोजन इ.कारणासाठी दवाखान्याचा वापर करतात. साधारणतः १० ते १४ टक्के आदिवासी कुटुंबे ही प्रसुति, कुटुंबनियोजन इत्यादी कारणांसाठी तर २८ टक्के कुटुंबे लसीकरणासाठी दवाखान्याचा वापर करतात, असे उपलब्ध आकडेवारीवरुन दिसते. ठाकर जमातीमध्ये दमा व क्षय या दोन गंभीर आजारांचे रुग्ण अन्य रोगांच्या मानाने जास्त आढळते.

निष्कर्ष :-

ठाकर जमातीमध्ये अन्य आदिवासी जमातीच्या मानाने साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी आहे. त्याबाबत स्थानिक पातळीवर योग्य त्या उपाययोजना होणे आवश्यक आहे.

२. ज्या गांवामध्ये १० टक्के पेक्षा कमी साक्षर ठाकर पुरुष/स्त्रिया आढळल्या आहेत. त्या गांवामध्ये स्थानिक पातळीवर साक्षरता सुधारणेचे विशेष कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. प्रथमतः कमी साक्षरतेच्या कारणांचा शोध घेऊन, त्यातील उणीवा/अडचणी दूर करणे गरजेचे आहे असे वाटते.

३. सर्वसाधारणपणे 'शैक्षणिक गळती' ठाकर जमातीमध्येही दिसून येते. कारण उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे ठाकर जमातीत प्रमाण अत्यंत नगण्य आढळले आहे. याबाबतही कारणांचा शोध घेऊन उपाययोजना करणे गरजेचे आहे, असे वाटते.

४. २०% ठाकर कुटुंबे ही कच्च्या स्वरुपाच्या घरामध्ये राहतात व त्या घरांचे आकारमान ही लहान असल्याचे उपलब्ध आकडेवारीवरुन आढळून आले आहे. इंदिरा आवास किंवा सुधारीत पध्दतीच्या गृहनिर्माण योजनांची घरे या जमातींच्या कुटुंबांना उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे, असे वाटते.

५. ठाकर कुटुंबाकडे जी काही शेतजमीन उपलब्ध आहे ती मोठ्या प्रमाणात जिराईत या प्रकारातील असल्याने त्यांना या शेतजमीनीपासून कमी उत्पन्न मिळते. त्यामुळे त्यांना शेतमजूरी व अन्य मजूरीवर अवलंबून राहावे लागते. याकरिता जिरायत शेतीचे बागायती शेतीमध्ये कसे परिवर्तन होईल हे पाहणे गरजेचे आहे. याकरिता सुधारीत शेतीविषयक सोयी सवलती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

६. भूमीहिन ठाकर कुटुंबांचा विचार करता, स्वयंरोजगार स्थानिक पातळीवर कसा उपलब्ध होईल यादृष्टीने विचार होणे गरजेचे आहे. कारण २१ टक्के कुटुंबे ही रोजगाराच्या शोधात स्थलांतर करीत असल्याचे प्राप्त आकडेवारीवरुन आढळून आले आहे. याकरिता रोजगार हमी योजनांतर्गत रोजगार, स्टोव्ह/सायकल दुरुस्ती, वीजपंप/हातपंप दुरुस्ती, विणकाम,मासेमारी इ.स्वरुपाचे स्वयंरोजगार उपलब्ध होऊ शकणाऱ्या योजनांचे त्यांना प्रशिक्षण देणे व आवश्यक साधने त्यांना उपलब्ध करुन देणे गरजेचे वाटते. तसेच ठाकर जमात ही वनक्षेत्रालगत वास्तव्यास असेल तर वनक्षेत्रामध्ये वनतळ्यांचे बांधकाम, रोपे लावणे, रानमेवा गोळा करणे इ.स्वरुपाची कामे ठाकर जमातींच्या कुटुंबांना उपलब्ध करुन दिल्यास स्थानिक पातळीवर रोजगाराचा प्रश्न सुटेल, असे वाटते.

७. ठाकर जमातीच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्यविषयक माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आणि वैद्यकिय सुविधा त्यांना स्थानिक पातळीवर पुरविणे गरजेचे आहे, असे वाटते.

आधार:-

१. *भारतीय जनगणना पुस्तिका*
२. *बेंचमार्क सर्वेक्षण मालिका क्र.३*

* * *

पारधी जमातीची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक पाहणी

*श्री.एम.एस.गायकवाड

प्रास्ताविक

महाराष्ट्र राज्यातील बहुतेक शहरातील बसस्थानक, रेल्वेस्टेशन यांच्या परिसरात आपणास या जमातीची लोक दिसून येतात. पारधी जमातीचे लोक मळके व फाटके कपडे घालून सार्वजनिक ठिकाणी बऱ्याच वेळा दृष्टीस पडतात. सदर जमातीला शासनाच्या विकास प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न झाले आहेत व प्रयत्न चालू आहेत. तथापि, शासनाच्या विकास कार्यक्रमांचा मोठ्या प्रमाणावर लाभ या जमातीस अद्याप घेता आलेला नाही. 'पारधी' म्हणजे शिकार करणे या संज्ञावरुन पारधी जमात ओळखली जात होती. फांसा म्हणजे पाश किंवा जाळे आणि अँडवींचिंर म्हणजे 'अठवीमध्ये संचार करणारे'(जंगलात भटकणारे) 'फासे पारधी' यासारख्या नांवावरुन या जमातीतील लोकांचा व्यवसाय सूचित होतो. या जमातीमध्ये अनेक पोटजमाती असून त्यांस हरिण पारधी, पालपारधी, राजपारधी, मीर, वाघारी, नेवारी, टाकणकार, बहेलिया, मोधिया, भिल्ल पारधी, लंगोटी पारधी, गायपारधी इत्यादी अनेक पोटजाती आहेत.

२. वास्तव्य

सन १९८१ व १९९१ च्या जनगणनेनुसार फासे पारधी ही जमात प्रामुख्याने अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, सोलापूर, उस्मानाबाद, यवतमाळ, जळगांव, धुळे, अहमदनगर इत्यादी जिल्ह्यांमध्ये मुख्यत्वे करुन वास्तव्य करीत असल्याचे दिसून येते.

जिल्हानिहाय सन १९८१ व १९९१ च्या जनगणनेनुसार पारधी जमातीची लोकसंख्या खालील दर्शविलेल्या तत्क्त्यांप्रमाणे उपलब्ध आहे.

---

*सांख्यिकी अधिकारी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे

तक्ता

जिल्हानिहाय पारधी जमातीची लोकसंख्या

अ.क्र.	जिल्हा	१९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या		१९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या	
		एकूण	शहरी	एकूण	शहरी
१.	मुंबई आणि उपनगरे	२१९७	२१९७	३५४९	३५४९
२.	ठाणे	४९४	३१७	१०२३	८७७
३.	रायगड	१००	७९	१२८	६८
४.	रत्नागिरी (सिंधुदुर्गसह)	४२	-	६०/३२	२२/-
५.	नाशिक	२२२३	४३५	३३०८	७५९
६.	धुळे/नंदूरबार	६३६७	६००	७८२८	९६०
७.	जळगांव	१२७७४	३७४१	१४०६४	४६९४
८.	अहमदनगर	३६१८	१९१	४६५८	४१३
९.	पुणे	२७२०	९७२	४७२३	१५१०
१०.	सातारा	५११	३१	४७१	६०
११.	सांगली	७१५	१०	७६२	३
१२.	सोलापूर	७३३२	१२५४	८४७०	१३९१
१३.	कोल्हापूर	८५२	३००	३६९	४४
१४.	औरंगाबाद/जालना	६९८	८५	६९४/६२५	८४/१२६
१५.	परभणी/हिंगोली	२३३१	५३८	२४८५	७२६
१६.	बीड	२०७९	१३	१९९२	४१
१७.	नांदेड	८३८	१७८	१११४	३५९
१८.	उस्मानाबाद/लातूर	५४५१	७५२	७७४१/४६३	१२१५/२७
१९.	बुलढाणा	९९०८	५४६	१२१४०	१०३८
२०.	अकोला/वाशिम	११२७१	६४७	१६६६३	१६४४
२१.	अमरावती	१३९४३	१०१३	१८४२४	१५९३
२२.	यवतमाळ	४४१०	५१	७००१	२५५
२३.	नागपूर	१३००	१२५	१५३२	३०७
२४.	वर्धा	१७४८	२२२	२२८१	२००
२५.	भंडारा/गोंदिया	८४	९	१०२	५
२६.	चंद्रपूर/गडचिरोली	११०९	१२	९०२/२०९	१०३/१४
	एकूण महाराष्ट्र	९५११५	१४३१८	१२३८१३	२२०८७

३. शासनाचेआरक्षणाबाबतचे धोरण

केंद्र शासनाच्या सन १९७६ मधील आदेशान्वये महाराष्ट्र राज्यातील ४७ अनुसूचित जमाती म्हणून जाहीर केल्या आहेत. त्या आदेशातील यादीवर अ.क्र.३८ वर पारधी, आडवी चिंचेल, फासेपारधी, लंगोटी पारधी, बहेलिया, चित्ता पारधी, शिकारी, टाकणकार, टाकिया यांचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये केलेला आहे.

महाराष्ट्र शासन, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती सुधारणा कायदा - १९७६ च्या आदेशातील यादीत अ.क्र.९ वर राजपारधी, पालपारधी, गांवपारधी, आणि हरणशिकारी यांचा विमुक्त जातीत समावेश केलेला आहे.

४. व्यवसाय

पारधी जमात चपळ व सौशिक आहे. त्यांचा पारंपारिक व्यवसाय शिकार करणे हा होता. शिकारी व्यतिरिक्त शेतमजूरी, शेती व पाथरवटाचे काम ते करतात. या समाजात गुन्हेगारी प्रवृत्ती आढळते. पारधी समाजाकडे पारंपारिक व्यवसाय उरलेला नाही. तसेच त्यांच्याकडे पारंपारिक व्यवसाय व पांरपारिक कसबही नाही. सर्वसाधारणपणे एकूण जमातीपैकी ७० टक्के लोक शेतमजूरी व मोलमजूरी करुन आपला उदरनिर्वाह करीत असतात. उदरनिर्वाहासाठी या समाजाची काही कुटुंबे स्थलांतरे करीत असतात. त्यामुळे या समाजाची शैक्षणिक प्रगती होऊ शकत नाही.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत अलिकडे घेण्यात आलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील बेंचमार्क सर्वेक्षणांतर्गत पारधी जमातीचे व्यावसायिक वर्गीकरण खालीलप्रमाणे दिसून आले आहे.

पारधी जमातीची कुटुंबे (संख्या)	कुटुंबांच्या मुख्य व्यवसायानुसार त्यांचे वर्गीकरण						
	शेती	शेतमजूरी	दुग्धव्यवसाय	सेवा	कामगार	जंगलमजूरी	इतर
७०४	२०४	४३८	०	२४	५	३२	१

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत अलिकडे घेण्यात आलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील बेंचमार्क सर्वेक्षणांतर्गत पारधी जमातीच्या भूधारक व भूमीहीन कुटुंबाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे दिसून आले आहे.

पारधी जमातीची कुटुंबे (संख्या)	भूमीहिन कुटुंबे (संख्या)	भूधारक कुटुंबे (संख्या)	भूधारकापैकी		क्षेत्रफळानुसार वर्गीकरण				
			बागायत	जिरायत	० ते १	२ ते ३	३ ते ५	५ ते १०	१० पेक्षा जास्त
७०४	४६५	२३९	८	२३१	३३	१७३	२८	५	०

उपरोक्त आकडेवारीवरुन सदर जमातीतील एकूण ७०४ पैकी फक्त २३९ कुटुंबे भूधारक आहेत. त्यापैकी बागायती शेती असलेले शेतकरी ७०४ कुटुंबांपैकी फक्त ८ आहेत. थोडक्यात सदर जमातीतील शेतकरी बहुतेक जिराईती भूधारक असून ते आर्थिकदृष्ट्या मागासले आहेत.

५. घर व त्यांचे स्वरुप-

पारधी लोक झोपड्या बांधून राहतात. चिखलमातीने लिंपलेल्या भिंती व वर धाब्याचे छप्पर अशी त्यांच्या घरांची ठेवण असते. चौकोनी आकाराच्या या घरांना पुढील बाजूस एकच दरवाजा असतो. पण खिडक्या नसतात. हे लोक घरासमोर उघड्यावरच आंघोळ करतात. त्यांच्या घरासमोर तुळशीचे रोप लावलेले असते. गुरे अंगणातच बांधलेली असतात. काही जिल्ह्यात पारधी जमातीची घरे मातीच्या धाब्याची असतात. ती एकमेकांना लागून असतात. त्यांना 'पाल' म्हणतात. त्यांच्या वसतीला पारधवाडा असे म्हणतात. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील बेंचमार्क सर्वेक्षणात ७०४ कुटुंबांच्या पाहणीत घराचे स्वरुप पुढीलप्रमाणे दिसून आले आहे.

घराच्या स्वरुपानुसार कुटुंबाचे वर्गीकरण

पारधी जमातीची कुटुंबे (संख्या)	घराच्या स्वरुपानुसार कुटुंबाचे वर्गीकरण					
	झोपडी/ पाल	झोपडी मंगलोरी कौले	मंगलौरी कौलांची पक्की घरे	पत्र्याचे छप्पर असलेली पक्की घरे	आर.सी.सी. घरे	इतर
७०४	२११	३४८	७८	३०	७	३०

६. सामाजिक स्वरुप

या जमातीतील अनेक अंतर्विवाही गट आहेत. जसे फासेपारधी, राजपारधी, हरीणपारधी, लंगोटी पारधी आणि टाकणकार इत्यादी. त्यांच्यात 'देवक' (toterm) किंवा गोत्र आढळत नाही. राठोड, चव्हाण, सोळंकी, पवार, काळे इ.कुळी आहेत. या जमातीत पितृसत्ताक कुटुंब पध्दती असून लग्नात वधूमूल्याची प्रथा आहे. मुले-मुली वयात आल्यावर विवाह होतात. जर एखाद्या नवऱ्या मुलांस वधूमूल्य देण्याची ऐपत नसेल तर त्याने आपल्या भावी सासऱ्याकडे काम करावे, असा रिवाज या जमातीत आढळून येतो.

पारधी जमातीचे लोक हिंदू आहेत. ते उत्सवांत नृत्य करतात. मारुती, महादेव, विठोबा, भैरव, देवी यांची पूजा करतात. पारध्यांमध्ये 'दसरा' सणास विशेष महत्व आहे. गुढीपाडवा, अक्षयतृतीया, पोळा, नवरात्र, दिवाळी व शिमगा यासारखे हिंदूचे सणही साजरे केले जातात.

७. साक्षरता

शिक्षण व साक्षरता यांचे प्रमाण या जमातीतील फारच कमी आहे. ही जमात स्थलांतर करीत असल्यामुळे शिक्षणांचे प्रमाण अल्प आहे. खेडेगांवामध्ये चालविण्यात येणाऱ्या साक्षरतेच्या वर्गाचाही ते लाभ घेत नाहीत. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने आदिवासी उपयोजना क्षेत्रात नुकत्याच केलेल्या बेंचमार्क सर्वेक्षणात पारधी समाजाच्या ७०४ कुटुंबाची साक्षरता स्थिती खालीलप्रमाणे दिसून आली आहे.

पारधी जमातीची कुटुंबे	पुरुष	स्त्रिया	एकूण
७०४	३७.४३%	१९.९५%	२९.१३%

८. शैक्षणिक प्रगती

शिक्षणासाठी शासनाने अनुसूचित जमातीसाठी खास सेवा व सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. शासन स्तरावर गेल्या ५० वर्षात मोठ्या प्रमाणात प्रयत्न करुन देखील पारधी जमातीचा शैक्षणिक स्तर अपेक्षे एवढा उंचावलेला नाही, असे वाटते. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने आदिवासी उपयोजना क्षेत्रात केलेल्या बेंचमार्क सर्वेक्षणाच्या पाहणीतील शैक्षणिक स्तराविषयी खालीलप्रमाणे

आकडेवारी दिसून आलेली आहे.

पारधी जमातीची कुटुंबे (संख्या)	कुटुंबा तील व्यक्तींची संख्या	शैक्षणिक स्तरानुसार व्यक्तीचे वर्गीकरण									
		४ थी पर्यंत	७ वी पर्यंत	१० वी पर्यंत	१२ वी पर्यंत	आय.टी. आय.	पदविका धारक	पदवीधर, कला वाणिज्य, सायन्स इ.	अभि-यंता	वैद्यकिय	पदव्युत्तर किंवा पी.एच.डी.
७०४	२६५०	४३२	१६९	९३	३२	०	५	४	१	०	०

वरील आकडेवारीवरुन असे दिसून आले की, पाहणीतील एकूण २६५० व्यक्तींपैकी चार व्यक्ती आतापर्यंत पदवीधर असून अभियंता, वैद्किय सेवा व पदव्युत्तर पदवीधर इ.शैक्षणिक स्तर प्राप्त केलेली एकच व्यक्ती या समाजात बेंचमार्क पाहणीअंतर्गत आढळून आलेली आहे. म्हणून पारधी जमातीची शैक्षणिक प्रगती अल्प असल्याचे दिसून येते.

९. नियोजनांतर्गत पारधी जमात

पारधी जमात बहुतांशी शेतमजूर आहे. रोजगार व उदरनिर्वाहासाठी या जमातीतील काही कुटुंबे स्थलांतर करीत असतात. स्थलांतरीत करीत असलेल्या कुटुंबातील मुलांना शिक्षण घेता येत नाही. या जमातीत निरक्षरता, दारिद्रय, रुढी व अज्ञान याचा फार मोठा पगडा दिसून येतो. केंद्र व राज्य शासनामार्फत जनजातीसाठी असलेल्या अनेक योजनांचा या जमातीस अपेक्षित लाभ घेता आलेला नाही, असे दिसते. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत बेंचमार्क सर्वेक्षणांतर्गत एकूण ७०४ कुटुंबांची पाहणी केली होती. त्या पाहणीमध्ये विकास योजनांचा लाभ मिळालेली कुटुंबे व लाभ न मिळालेल्या कारणानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे उपलब्ध झाले आहे.

पारधी जमातीची एकूण कुटुंबे (संख्या)	योजनेचा लाभ मिळालेली कुटुंबे	योजनेचा अद्याप लाभ न मिळालेल्या कुटुंबाची संख्या	लाभ न मिळण्याची कारणे						
			योजना माहिती नसल्यामुळे	कागद पत्रांची पूर्तता नाही	अंमलबजावणी अधिकाऱ्यां-कडून उदासिनता	आवश्यक रक्कम भरता न येणे	थकबाकी दार	दिरंगाई	इतर
७०४	३९३	३११	२८०	१२	७	५	१	३	३

आदिवासी उपयोजनांतर्गत शासकीय योजनांच्या आकडेवारीचे अवलोकन केले असता ७०४ कुटुंबांपैकी आतापर्यंत ३११ कुटुंबाना फक्त वेगवेगळ्या योजनांचा लाभ घेता आलेला आहे. तथापि, एकूण ७०४ कुटुंबापैकी ३११ कुटुंबांना अद्याप लाभ घेता आलेला नसून त्यांचे प्रमुख कारण योजनांची माहिती नसणे किंवा योजनांबाबत अज्ञान असणे हे कारण दिसून आलेले आहे.

शिफारशी -

१. स्थलांतरीत करणाऱ्या कुटुंबांचे पुनर्वसन करुन त्यांना राहण्यासाठी 'इंदिरा आवास योजनांतर्गत' पक्की घरे उपलब्ध करुन देणे तसेच रोजगार निर्मितीसाठी मत्स्यव्यवसाय, सायकल दुरुस्ती, गवंडी काम, स्टोव्ह दुरुस्ती, रिक्षा व्यवसाय, विडी उद्योग इत्यादी उद्योगांचे व्यावसायिक प्रशिक्षण देऊन व आर्थिक मदत देऊन व्यवसाय करण्यास या जमातीस प्रवृत्त करणे.

२. या समाजात साक्षरता व शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी 'प्रौढ शिक्षण योजना' व मुला-मुलींकरिता आश्रमशाळांमध्ये प्राधान्याने प्रवेश देऊन त्याची शैक्षणिक प्रगती करावी.

३. भूमीहिन कुटुंबांच्या व्यक्तीस स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करुन देण्यात यावा. महाराष्ट्र शासन स्तरावर शासनाच्या निर्णयानुसार राज्यातील प्रत्येक सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या पारधी कुटुंबातील किमान ५ व्यक्तीस किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीस रोजगार देण्याची कारखान्यांवर सक्ती करावी.

४. पारधी जमातीकडे जिराईत शेतजमिनीचे प्रमाण अधिक आहे. अशा जिराईत जमिनीस पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. सिंचनासाठी पाणीपुरवठा, सुधारीत बि-बियाणे, सुधारीत अवजारे देऊन, कृषी विभागांमार्फत शेतकऱ्यास सुधारीत/ आधुनिक शेती तंत्रांचे प्रशिक्षण देण्यात यावे.

५. काही पारधी कुटुंबाची दारिद्रय रेषेखालील यादीत नांवे समाविष्ट झालेली नाहीत. त्यांचे प्रमुख कारण त्यांची कुटुंबे स्थलांतर करतात. त्यामुळे त्यांच्यासाठी खास सदर यादीत नांवे समाविष्ट करुन त्यांना रेशनकार्ड, ओळखपत्र इ.देण्यात यावीत व त्यांना वेगवेगळ्या योजनांचा लाभ देण्यात यावा.

६. पारधी जमातीमध्ये शिक्षणाची गळती आढळून आलेली असल्याने यामध्ये सुधारणा होणे गरजेचे वाटते.

* * *

आदिवासी कला विश्व
'नृत्य आणि वाद्ये'

*रमेश वि.रघतवान

दूर दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या आदिवासींनी शतकानुशतके अनुभवातून स्वत:ची अशी नृत्य संस्कृती निर्माण केली आहे. नृत्य, संगीत हा या संस्कृतीचा आत्मा. नृत्य संगीताला वाद्याची जोड असल्याशिवाय त्याचा अविष्कार जुळत नाही.

आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय सुध्दा याबाबतीत मागे नाही. येथे आपणास त्यांची बहुतेक वाद्ये पहावयास मिळतील. तर त्यांचा सुरेल पावरीचा आवाज आपणास मंत्रमुग्ध करुन जाईल. ठाकरांचा ढोल तर आपले रक्त सळसळावून सोडेल. तर तारपा आपला पाऊलखुणा बदलून चालण्याचा ढाचाच बदलून टाकेल. अशी कितीतरी वाद्य जमातनिहाय थोडाफार बदल करुन तयार झालेली. गांवशिवेप्रमाणे त्यांची नांवे बदलतात. तसा त्यांच्या सूरात, आवाजातपण बदल होतोच. आता आपल्या वारल्यांचा तारपा व कोकणाची पावरी वाद्य एकाच प्रकारातील सूर मात्र वेगळे. ठेका, चाल, विभाग व वाजविण्याची कला वेगळी. नाचमात्र जवळपास सारखाच. वापरलेली साधने सारखी. अगदीत तीच फक्त बनविणाऱ्याची कला वेगळी. अशा जगावेगळ्या परंतू सांस्कृतिक वारसा टिकवून आपली परंपरा जागवित ठेवणाऱ्या आदिवासी वाद्यांचा परिचय पुढीलप्रमाणे-

ढोल :-

हे वाद्य आदिवासीनृत्यात सर्वदूर लोकप्रिय आहे. बकऱ्याच्या कमावलेल्या कातड्यांपासून ते मढवितात. लाकडाच्या कोरीव खोबतीला दोन्ही बाजूस लावून त्याला गुंफतात आणि वाजविण्यापूर्वी त्याला विस्तवावर तापवून शेकतात. ढोलांची एक बाजू टिपरीने तर कधी दोन्ही काठ्यांनी वाजवितात तर काही हाताने

*छायाचित्रकार तथा चलचित्रपट यंत्रचालक

वाजवितात. ढोल काही जमिनीवर ठेवतात तर कधी गळ्यात अडकवून वाजविला जातो. दीड-दोनशे स्त्री पुरुषांच्या नृत्याला साथ देणारा ढोलही तसाच मोठा असतो. त्याचा ध्वनी गंभीर व घुमणारा असतो. मंगलप्रसंगी ढोलवादनाला विशेष महत्व असते.

ढोलक :-

हे वाद्य आंब्याच्या किंवा वडाच्या पोकळ लाकडाच्या ओंडक्यापासून बनवितात. हाताच्या बोटांनी ढोलक वाजवितात. त्याचा दाऱ्या कमी-अधिक घट्ट आळवून वाजवितात. बहुतेक आदिवासी नृत्यात ढोलक असतो. ढोलक्यावरची धाप म्हणजे नाचाला निमंत्रण.

पागई :-

हे वाद्य ढोलासारखेच असते. पण मडक्याप्रमाणे माती भाजून बनविलेले असते. भाजलेल्या मातीच्या दंडगोलाच्या दोन्ही तोंडाला कमावलेले कातडे बसविणलेले असते.

नगारा :-

हा नगारा ढोलाच्या मानाने लहान असतो. लग्नप्रसंगी नगारा वाजवितात. पावरी भाषेत नगाऱ्याला 'तुतडी' म्हणतात. लग्नप्रसंगी व इतर वेळी कवेळ ही वाद्य वाजवून उदरनिर्वाह करणारी कुटुंबे दिसतात.

डफ :-

हे चर्मवाद्य आहे. चार ते पाच इंच लाकडी फळीच्या एका गोल कडेवर कमावलेले कातडे मडवितात. हे वाद्या बारीक काड्यांनी वाजवितात. डफाचा आवाज खणखणीत निघावा म्हणून वाजविण्यापूर्वी जाळावर गरम करतात.

डाफ :-

या वाद्याची पृष्ठ्ये गाईच्या श्वासपटलाची असतात. आठव्याच्या आकारासारखे हे वाद्य असते. घोट्याजवळ बांधून डाफ वाजविण्यात येते. एखाद्याच्या अंगात आणण्यासाठी, वर्षश्राध्दाच्या वेळी आणि हिरव्या देवाच्या पूजाप्रसंगी वारली जमातीचे लोक हे वाद्य वाजवितात.

डेग :-

मातीच्या भांड्यापासून हे वाद्य बनवितात. भाजलेल्या मातीचा डेरा घेऊन

त्याला माडाची किंवा सागाची पाने लावतात. हे वाद्य एका लांब काठीच्या सहाय्याने वाजवितात. प्रथम ठेक्याची पूजा करतात आणि नंतर फेरवादन करतात. विशेषतः वयोवृध्द स्त्रिया डेरा वाजवितात.

तुणतुणे :-

पोकळ भांड्याला खालच्या बाजूने कमावलेले कातडे ताणून ताठ बसविलेले असते. त्याला घोड्याचा केस किंवा तार बांधतात. वर एक काठी असते. अंगठ्याजवळच्या बोटाच्या सहाय्याने किंवा काडीने आघात करुन हे वाद्य वाजवितात. हे तंतूवाद्य प्रामुख्याने ढोलकीच्या बरोबर वाजवितात.

ताशा:-

हे टोपलीच्या आकाराचे चर्मवाद्य आहे. दोन्ही हातात काड्या घेऊन गळ्यात अडकविलेला ताशा वाजवितात. हे वाद्य मंगलप्रसंगी किंवा गांवजत्रा यामध्ये प्रामुख्याने वाजवितात.

किंगरी:-

हे तंतूवाद्य धनकुलीच्या सहाय्याने वाजवितात. या स्वरवाद्यात ताराऐवजी घोड्याचाकेस बसविलेला असतो. व्हायलिन किंवा सारंगीची ही आदिम अवस्था असावी, असे वाटते. किंगरी वादकास 'थोटी' असे म्हणतात.

टिमकी:-

मातीच्या वाडग्यासारखा भांड्यावर कातडे कसून टिमकी हे वाद्य बनविले जाते. छोट्या काड्यांनी कमरेला बांधून हे वाद्य वाजवितात.

चिटकोश:-

हे वाद्य म्हणजे चिपळ्याची मोठी आकृती होय. एकाच हातात चिटकोऱ्याचे दोन्ही भाग धरुन वाजवितात. चटकोला नांवाचे हे वाद्य धनुष्याकृती कामटी धरुन वाजवितात.

मांदल :-

सागवानाच्या पोकळ गोल ओंडक्यास दोन्ही तोंडाला चामडे बसवून हे वाद्य तयार केले जाते. मोठ्या तोंडाला चिक्की लावून मग हे वाद्य वाजवितात. ह्या वाद्यास 'मांदल' किंवा 'मांदर' असेही म्हणतात. ढोलकीच्या आकारासारखे हे वाद्य असते.

घंगली :-

हे वीणेच्या आकारासारखे वाद्य असते. या वाद्यात दोन दुधी भोपळे असतात. एका बाजूस वाकड्या तोंडाची काठी बांधलेली असते.

त्या काठीला वीणेच्या खुंट्याप्रमाणेच दोन खुंट्या बसविलेला असतात. काहींच्या वाकड्या तोंडला व खुंट्याना तारा बांधतात. हे दोन्ही भोपळे बगलेत धरुन छाती पुढे आलेल्या आड्व्या तारांना दोन्ही हातांनी छेडतात व गाणे म्हणतात. एका गांवात एखाद दुसरा छंगली वादक असतो. शुभप्रसंगी व आनंदाच्या प्रसंगी हे वाद्य वाजविीत. कणसरी म्हणजे सृजनाची देवी. कणसरी मातेच्या स्तुतीपर, धान्याची रास पडल्यावर, मुलांच्या जन्मप्रसंगी हे वाद्य वाजवून नृत्य करतात. हे वारलीचे आवडते वाद्य आहे.

तारपा :-

सुकलेला लांबट दुधी भोपळा, बांबूच्या दोन नळ्या आणि ताडाची पाने यांच्या सहाय्याने हे वाद्ये तयार करतात. गारुड्याच्या पुंगीसारखे हे वाद्य दिसते. बांबूच्या नळ्या, भोपळ्याच्या एका बाजूस असतात. त्या आपल्या पाव्यासारख्या असतात आणि दुसऱ्या बाजूस भोंगा असतो. हा भोंगा माडाच्या झापळ्या पासून तयार करतात. एकजण तारपा वाजवितो. आणि वर्तुळाकार फेर धरुन इतर नृत्य करतात. तारपाकऱ्याच्या सुरातीत बदलाप्रमाणे नर्तकाचा पदन्यास बदलतो. नृत्याला तारपाची साथ एखाद्या जरतारी किनारीसारखी भासते. तारपा वाद्य हे आदिवासी वाद्यांचा राजा असे संबोधतात.

* * *

वृत्तविशेष-

महाराष्ट्रातील आदिवासी हस्तकलेची विक्री व प्रदर्शन प्रथमच भारता बाहेर लंडन व स्कॉटलंडमध्ये

श्री.आर.डी.खरोसेकर, आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे व सौ.रश्मी सावंत, अध्यक्ष, टुरिझम-को-ऑपरेटीव्ह यांच्या संयुक्त प्रयत्नामुळे लंडन एडनबर्ग (स्कॉटलंड) येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय मेळाव्यात महाराष्ट्रातील आदिवासी हस्तकला विक्री व प्रदर्शनास भव्य प्रतिसाद

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे हे आदिवासींच्या हस्तकलांना प्रोत्साहन व उत्तेजन देंण्यासाठी, त्याचप्रमाणे त्यांनी तयार केलेल्या वस्तुंना बाजारपेठ मिळवून पर्यायाने त्यांना आर्थिक उत्पन्न मिळवून देण्यासाठी अनेक प्रयत्न करीत असून या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून प्रत्येक वर्षी महाराष्ट्रातील मोठ्या शहरात आदिवासी हस्तकला विक्री व प्रदर्शन आयोजित करण्यात येते.

यावर्षी श्री.आर.डी.खरोसेकर, आयुक्त व इंडिया टुरिझम यांच्या प्रयत्नामुळे या सुंदर वस्तुंना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रथमच यशस्वी प्रयोग करण्यात आला.

लंडन, एडनबर्ग (स्कॉटलंड) येथे दिनांक २७ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या भव्य आंतरराष्ट्रीय मेळाव्यात संयोजक एडनबर्ग मेळावा यांच्या खास निमंत्रणावरुन आदिवासींनी तयार केलेल्या अनेक सुंदर वस्तु ज्यात, वारली पेंटींग्ज, बांबूकाम, धातू कारागिरी, विविध मुखवटे यांचे प्रदर्शन व विक्री करण्यात आली. तसेच आदिवासी हस्तकलेला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मोठ्या प्रमाणात मागणी असल्याचे दिसून आले.

या आंतरराष्ट्रीय मेळाव्यात, चीन, बांगलादेश, पाकिस्तान, अमेरिका इ.देशांनी भाग घेतला होता. भारतातर्फे राजस्थान, गुजराथ व महाराष्ट्र या राज्यातून कलाकारांनी भाग घेतला.

या भव्य मेळाव्यात आदिवासी कलाकारांना प्रथमच भारताबाहेर जाण्याची संधी मिळाली असून त्यांनी आपली कला हजारो परदेशी नागरिकांना दाखविली.

नथू देवू संतार	वारली चित्रकार व तारपावादक
सुभाष धर्मा कडू	पारंपारिक मुखवटे
सुरेश चंद्रा पुंगाटी	पारंपारिक धातूकाम व बांबूकाम कला

तसेच छायाचित्रकार श्री.आर.व्ही.रघतवान, हे श्री. खरोसेकर, आयुक्त यांच्यासमेवत लंडन (स्कॉटलंड) येथे दि.२७ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या कालावधीत होते.

या आंतरराष्ट्रीय मेळाव्यात आदिवासी वस्तुंना मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळण्याची शक्यता असून अनेक परदेशी व्यापारी व संस्था यांनी वस्तु विकत घेण्याची तयारी दर्शविली असून पुढील वर्षी होणाऱ्या १० देशातील आंतरराष्ट्रीय मेळाव्यास उपस्थित राहण्याचे निमंत्रण दिले आहे.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

शासनाच्या शिक्षण व समाज कल्याण विभाग, शासन निर्णय क्र. बीसीई १०६५/५४०३-एम दिनांक २१.१.६२ च्या अन्वये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेची कार्ये व व्याप्तीबाबत एकूण तीन विभागामध्ये राबविण्याच्या योजनांची तपशिलवार कामे शासनाने संस्थेकडे सुपूर्त केलेली आहे.

अ) सखोल अभ्यास करणे

ब) आकडेवारीचे संकलन करणे तसेच तांत्रिक माहितीचे संकलन

क) खास बाबीची कामे

उपरोक्त क्र. ३ अंतर्गत खास प्रकारच्या योजना संस्थेकडे सुपूर्त केलेल्या आहेत.

१) आदिवासींवर पुस्तके तयार करणे

२) आदिवासी गाणी व लोकगीते जमविणे व प्रसिध्द करणे

३) आदिवासींच्या जीवनावर संक्षिप्त लघुपट तयार करणे

४) आदिवासी संग्रहालयाची स्थापना

५) ग्रंथालयाची स्थापना

६) प्रशिक्षण सत्राची स्थापना

उपरोक्त कार्याव्यितिरिक्त शासनाने खालीलप्रमाणे कामे संस्थेस सुपूर्त केलेली आहेत.

१) राज्य सरकारची संशोधन शिष्यवृत्ती

२) केंद्र सरकारची संशोधन शिष्यवृत्ती

३) अनुदानित संस्थांना देण्यात यावयाच्या आर्थिक मदतीबाबत संस्थेचे अभिप्राय देणे

४) महाराष्ट्रातील कातकरी, कोलाम व माडिया गोंड हया अतिमागासलेल्या जमातीच्या आरोग्यावर पायलट प्रोजेक्ट तयार करणे व नवीन योजना तयार करणे

५) महाराष्ट्रातील ७ आदिवासी जमातींच्या बोलीभाषेवर डिक्शनरी तयार करणे

६) मेडिकल व इंजिनियरींगला १२वी पास झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी लागणारे आदिवासी असल्याबद्दलचे प्रमाणपत्र तपासणी समितीकडून योग्य ती कार्यवाही पूर्ण करून प्रदान करणे

संस्थेकडे शासनाने सुपूर्त केलेल्या उपरोक्त कामांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

अदिवासींच्या कलेचे व संस्कृतीचे जतन व संवर्धन, त्याचप्रमाणे विकास होण्याच्या दृष्टीने शासनाने खालीलप्रमाणे योजना राबविण्यासाठी सुपूर्त केलेल्या आहेत.

१) आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय - संग्रहालय विस्तार व नूतनीकरण -

सन १९६२ मध्ये आदिवासी कलासंग्रहालयाची स्थापना झाली तेंव्हापासून आदिवासी विभागात जाऊन त्यांच्या दैनंदिन वापरातील दुर्मिळ वस्तू, देवदेवता, मासेमारीची साधने, शिकारीची साधने,

दागदागिने, कलाप्रकार इत्यादी संकलित करण्याचे काम सातत्याने सुरू आहे. आज संग्रहालयात एकवीसशेहून अधिक वस्तू आहेत. गेल्या एक दीड वर्षात तीनशेहून अधिक वस्तू संग्रहालयासाठी खरेदी करण्यात आल्यात. त्यात मुख्यत्वे दागदागिने, दैनंदिन वापरातील वस्तू, बांबूच्या वस्तू, लाकडी शिल्प, धातुशिल्प इत्यादींचा समावेश आहे. अमरावती जिल्हयातील धारणी प्रकल्प, नांदेड जिल्हयातील किनवट प्रकल्प, ठाणे जिल्हयातील जव्हार प्रकल्प व डहाणू प्रकल्प, धुळे जिल्हयातील तळोदा प्रकल्प, नंदूरबार जिल्हयातील नंदूरबार प्रकल्प तसेच नगर जिल्हयातील राजूर प्रकल्प या ठिकाणी संस्थेचे प्रतिनिधी प्रत्यक्ष जाऊन वस्तू घेऊन आलेत. त्यात प्रामुख्याने माडिया, वारली, कोरकू, ठाकर, महादेव कोळी, पावरा इत्यादी जमातींच्या वस्तूंचा समावेश आहे. माडिया व वारली जमातीचे दागिने, कोरकूंचे नृत्यात घालावयाची आभूषणे, जुनी नाणी, महादेव कोळयांची दैनंदिन वापरातील नवी जुनी भांडी, पावरा स्त्रीयांचे अलंकार, लग्नाची टोपली इत्यादी वस्तूंचे संकलन करण्यात आले.

संग्रहालयाच्या नूतनीकरणाचे प्रयत्नही सध्या सुरू आहेत. आदिवासी वाद्य व त्यांचे संगीत यांची सर्वसामान्य जनतेला माहिती देण्याच्या दृष्टीने वाद्यांसोबत इथे टेप बसविलेले आहेत. इथे भेट देणारे पर्यटक हे संगीत ऐकू शकतात. तसेच वारली, माडिया व कोलामांच्या झोपडीचे नमुनेही तयार करण्यात आले आहेत. त्यासोबत त्या जमातीचे फायबर पुतळेही झोपडीपुढे उभे करण्यात आले आहेत. नूतनीकरणाचा एक प्रमुख भाग म्हणजे प्रकाशव्यवस्था. प्रदर्शित वस्तूंच्या सौंदर्यात आकर्षक प्रकाशयोजनेमुळे अधिकच भर पडली आहे.

दररोज संस्थेस सुमारे दोनशे देशी-विदेशी पर्यटक भेट देत असतात. उन्हाळयाची सुट्टी व दिवाळीच्या सुमारास ही संख्या ३०० पेक्षा जास्त असते.

२) आदिवासी पारंपारिक नृत्यस्पर्धा आयोजित करणे

आदिवासींच्या उपजत कलागुणांना वाव व उत्तेजन देण्याच्या हेतूने प्रत्येक वर्षी आदिवासी पारंपारिक नृत्यस्पर्धेचे आयोजन केले जाते. प्रकल्प स्तरावर घेण्यात येणाऱ्या पारंपारिक नृत्यस्पर्धेत कमीत कमी १० नृत्यपथकांना भाग घेण्यास परवानगी देण्यात येते. काही ठिकाणी जास्त पथके असल्यास त्याप्रमाणे १४ ते १५ पथकांना देखिल नृत्यस्पर्धेस भाग घेण्यास आमंत्रित करण्यात येते. एका

नृत्यपथकामध्ये वादक / गायक इत्यादीसह सर्व मिळून जास्तीत जास्त २० कलाकार असतात. शासन निर्णय क्रं संकीर्ण १०८९/६२८०/प्रक्र १४७/ का ५ दिनांक १५.१.९९ अन्वये नृत्यपथकातील कलाकारांना हजेरी भत्ता, पेहराव, वाद्ये, वेशभूषा व प्रसाधने भत्ता, प्रवास खर्च देण्यात येतो. त्याचप्रमाणे नृत्यस्पर्धेतील प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकावर आलेल्या नृत्यपथकांना बक्षिसे देण्यात येतात. साधारणपणे पारंपरिक नृत्यामध्ये खालीलप्रमाणे नृत्य प्रकार आढळतात.

१. घोरनृत्य
२. ढोलनाच
३. घोसाडी नृत्य
४. गोंडी दंडार नृत्य
५. मास्यनृत्य
६. होळीनृत्य
७. ढोल टापरी नृत्य
८. तारपा नृत्य
९. गौरीनृत्य
१०. ढोलपाई नृत्य
११. ढेमसा
१२. मांदोळ
१३. भवाडा इत्यादी

३) आदिवासी हस्तव्यवसायाला बाजारपेठ मिळवून देणे -

आदिवासींच्या कलागुणांना वाव व उत्तेजन मिळणे व त्यांच्या कलावस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून प्रसिध्दी देण्यासाठीच्या उद्देश्याने संस्थेमार्फत दरवर्षी आदिवासी हस्तकला प्रदर्शन नागरी भागात भरविण्यात येते. यात भाग घेणाऱ्या हस्तकलाकारांना प्रदर्शनात स्टॉल उपलब्ध करून देण्यात येतो. त्यांच्या येण्याजाण्याचा प्रवास खर्च, तसेच भोजन, निवासव्यवस्था शासनामार्फत मोफत करण्यात येते. प्रदर्शनात प्रामुख्याने वारली चित्रे, बांबू / वेतकाम, लाकडी कोरीव काम, मुखवटे, वाघाच्या वस्तू, ऊरसुंडी गवताच्या वस्तू, दागदागिने, धातूच्या मूर्ती, मातीच्या मूर्ती, काष्ठशिल्प इत्यादी वस्तू मांडण्यात येतात.

सन १९९८-९९ मध्ये पुणे येथे १.१.९८ ते ५.१.९८ च्या कालावधीत ६२ आदिवासी कलाकारांनी आदिवासी हस्तकला प्रदर्शनात भाग घेतला. सदरहु प्रदर्शनाचे उद्घाटन "आरोग्यमंत्री श्री. दौलतराव आहेर" यांनी केले. आदिवासी विकास मंत्री श्री. ए.टी.पवार हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. प्रदर्शनात

विक्रीसाठी आदिवासी कारागिरांनी एकूण रू. ४,९७,२५१/- एवढया रकमेच्या वस्तू आणल्या होत्या. यापैंकी रू. १,६७,०४३/- एवढया रकमेच्या वस्तूंची विक्री झाली.

सन १९९९-२००० मध्ये दिनांक २४ ते २८ फेब्रुवारी २००० पर्यंतच्या कालावधीमध्ये दि इन्स्टिटयूट ऑफ इंजिनियर्सच्या हॉलमध्ये आदिवासी हस्तकला प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. एकूण ८५ कारागिरांना आंमत्रित करण्यात आले होते. त्यापैंकी ---- कारागिरांनी प्रदर्शनात भाग घेतला. सदरहु प्रदर्शनात एकूण ३,६७,०००/- एवढया रकमेची विक्री झाली. सदरहु प्रदर्शनाचे उद्घाटन आदिवासी विभागीय आयुक्त, श्री. राजीव अग्रवाल यांनी केले. उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी श्री. विजयकुमार गौतम, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी श्री. अरविंद सिंह आणि प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक श्री. डी.एस.कुलकर्णी उपस्थित होते.

मागील वर्षी सन २०००-२००१ मध्ये देखिल पुण्यातील इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनियर्सच्या हॉलमध्ये दिनांक ९.२.२००१ ते १२.२.२००१ या कालावधीत प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. सदरहु प्रदर्शनाचे उद्घाटन आदिवासी विकास राज्यमंत्री श्री. प्रकाश आवाडे यांनी केले. प्रदर्शनामध्ये एकूण ६५ कारागिरांनी भाग घेतला व प्रदर्शनात सुमारे तीन लाख रकमेच्या वस्तूंची विक्री झाली.

४) आदिवासी वनौषधी व उपचार पध्दतीचे जतन करण्यासाठी आदिवासी पारंपारिक उपचारकांचे शिबीर व चर्चासत्र

दिनांक २.१.१९९९ ते ४.१.१९९९ या कालावधीत पुणे येथील इन्स्टिटयूशल ऑफ इंजिनियर्सच्या हॉलमध्ये भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन आरोग्यमंत्री श्री. दौलतराव आहेर यांचे हस्ते व मा. ना. श्री. ए.टी.पवार, मंत्री, आदिवासी विकास यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले. मा.ना. भाई विरकर, राज्यमंत्री, आदिवासी विकास हे देखिल कार्यक्रमास उपस्थित होते. सदरहु कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील ११८ आदिवासी उपचारक उपस्थित होते.

५) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी संदर्भात सक्षम अधिकाऱ्यांना येणाऱ्या अडीअडचणींबाबत मार्गदर्शन व चर्चा करण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांची कार्यशाळा

दिनांक २६.२.२००० रोजी इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनियर्सच्या हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती.

६) आदिवासी हस्तकला वस्तूंचे संकलन व विक्री केंद्र -

आदिवासी हस्तकलेला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि आदिवासी हस्तकलेची प्रसिध्दी करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत दरवर्षी हस्तकला प्रदर्शन नागरी भागात संस्थेंमार्फत आयोजित करण्यात येते. नुसत्या प्रदर्शनामुळे आदिवासी कारागिरांचा कायमस्वरूपी विविध साधन म्हणून उपयोग होणार नाही म्हणून नव्यानेच संस्थेमार्फत आदिवासी संग्रहालयाला संलग्न असे एक अद्यावत हस्तकला वस्तू विक्री केंद्र उघडण्यात आले आहे. सदर केंद्रात विविध प्रकारच्या हस्तकला वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. या वस्तू कशाप्रकारे तयार केल्या जातात त्यांचे प्रात्यक्षिक करण्यासाठी कटींगमध्ये कलाकारांना संस्थेत बोलावून घेण्यात येते. ते आपला कच्चा माल आणून वस्तू तयार करतात व त्या वस्तू विक्री केंद्रात विक्रीसाठी ठेवतात.

संग्रहालयाला दररोज १५० ते २०० पर्यटक भेट देतात. त्यात देशी- विदेशी पर्यटक आणि शाळा महाविघालयाच्या शैक्षणिक सहली यांचापण समावेश असतो. साहजिकच त्या निमित्ताने स्थायी बाजारपेठ व नियमित ग्राहक या कलावस्तूंना प्राप्त होत आहे.

परदेशी पर्यटकांना त्या या वस्तू सहज मिळाल्यामुळे त्यांचा आनंद व्दिगुणित झाल्याचे दिसून येते. त्यांचा वेळ व पैसा बराच वाचतो आणि त्यांना पारंपारिक शैलीच्या दुर्मिळ कलावस्तू संस्थेत मिळतात.

७) आदिवासी संगीत वादकांची कार्यशाळा -

संग्रहालयामध्ये अनेक प्रकारची आदिवासी वाद्ये शोकेसेमध्ये प्रदर्शित करण्यात आलेली आहेत. सदरहु आदिवासी वाद्यांचा आवाज पर्यटकांना ऐकू येण्यासाठी व त्या वाद्यांचा स्वाद घेण्यासाठी

संग्रहालयाच्या वाद्यांच्या दालनात आदिवासी वाद्य संगीत सुरू करण्याचे संस्थेने ठरविले आहे व काही प्रमाणांत सदरहु वाद्यांचे संगीत टेपव्दारे पर्यटकांना ऐकविण्यात येत आहे.

परिपूर्ण आदिवासी वाद्यांचे संगीत पर्यटकांना माहिती होण्यासाठी संस्थेने दिनांक ८ ते ९ सप्टेंबर २००१ या कालावधीत पुणे येथील प्रशिक्षण हॉलमध्ये आदिवासी संगीत वादकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदरहु कार्यशाळेस महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील प्रकल्पातून २५ वादक उपस्थित होते. वादक कलाकारांनी त्यांनी आणलेल्या वाद्याचे संगीत वाजवून दाखविले व त्या संगीताचे रेकॉर्डिंग करण्यात आले. तसेच उपस्थित वादकांची त्यांच्या पारंपारिक वेशभूषेसहीत वादकाचे वाद्य वाजवितानाची छायाचित्रे घेण्यात आली. घांगळी, डफवादक, भांगसर थाळी, तेंडोळी / तेडूंर, ढोल, पावरी, बिगुल इत्यादी वाद्यांचे संगीत रेकॉर्डिंग करण्यात आले.

आलेल्या सर्व वादक कलाकारांना येण्याजाण्याचा प्रवासखर्च व भोजन व निवासाची शासनामार्फत व्यवस्था करण्यात आली.

* * *

TRIBAL RESEARCH & TRAINING INSTITUTE'S PUBLICATIONS FOR SALES

संस्थेची विक्रीची प्रकाशने

1.	An Overview of Tribal Research studies	Rs.100=00
2.	A Review of Tribal Research Studies	Rs.35=00
3.	Socio cultural Dynamics of Tribal Development	Rs.19=00
4.	Strategies for Promotion & Propogation of Tribal Art and Handicrafts	Rs.50=00
5.	**आदिवासी लोकगीते**	Rs.7=00
6.	Tribal Research Bulletin Annual subscription	Rs.100=00

♦ ♦ ♦

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११ ००१.

जिल्हा नाशिक, तालुका सटाणा येथील वघांबा कोकणी जमातीचे पावरी नृत्य

धुळे जिल्ह्यातील पावरी भिल्ल युवक

TRIBAL RESEARCH BULLETIN

Tribal Research & Training Institute,
Maharashtra State, Pune - 411 001.

Tribal Research Bulletin is a bi-annual bulletin published in March and September. Contributors can contribute articles pertaining to various aspects related to tribal life, culture and development.

Guidelines for Contributors :

The manuscripts to be published in this Bulletin should be type written in double space on one side of the paper and carefully edited for matter as well as language and corrected for any typing errors. The matter should be organised under suitable headings. Tables should be preferrably incorporated in the body of the paper with relevant interpretation. Charts and maps should be in black and white only.

Manuscripts are not returned.

The views expressed by the authors do not necessarily reflect the views of the Government, and the editor is not responsible for the views expressed by the authors.

The contributors will be given 2 reprints and two copies of the Bulletin.

All correspondence should be addressed to the *Commissioner, Tribal Research and Training Institute, 28, Queen's Garden, Pune 411 001.*

Registration No.RN-37/438/79

FORM IV

(See Rule 80)

1. Place of Publication : 28, Queen's Garden Pune 411 001.

2. Periodicity of Publication : Bi-annual

3. Printer's Name : Manager Photozinco Press, Pune 411 001.

Nationality : Indian
Address : Photozinco Press, Pune 411 001.

4. Publisher's Name :Shri R.D.Kharosekar I.A.S.

Nationality : Indian
Address : 28, Queen's Garden Pune 411 001.

5. Editor's Name : Shri R.D.Kharosekar I.A.S.

Nationality : Indian
Address : 28, Queen's Garden Pune 411 001.

I, R.D.Kharosekar hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

30th September, 2001 *R.D.Kharosekar*
(Signature of Publisher)

Annual Subscription Rs. 100/-
Cost of Single copy Rs.50/-

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११ ००१.